**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीपसिंह शिवाजीराव धनवडे — अपीलकर्ता
नीलअंबर,२०७८, ख/६/अ, राजारामपुरी,
१२वी गल्ली, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक, विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीचो तारीख | दि. ७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. दिलीपसिंह शिवाजीराव धनवडे<br>नीलअंबर,२०७८, ख/६/अ, राजारामपुरी,<br>१२वी गल्ली, कोल्हापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,<br>कोल्हापूर श्री. वि. रा. गोस्वामी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | वरिष्ठ लिपिक, विधी विभाग, कोल्हापूर<br>महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री. श्रीकांत गोविंद देवकर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणी अर्जान्वये केलेली मागणी :- सन १९६७ साली जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी त्यांच्याकडील अपीलप्रकरणी १२ मुद्दयांचे स्पष्टीकरण सादर करण्याबाबत नगराध्यक्षांना दिलेल्या | |

| | आदेशासंदर्भातील कागदपत्रे |
|---|---|

## विवेचन

सन १९६७ मधील जिल्हाधिकाऱ्यांकडील अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी १२ मुद्दयांचे स्पष्टीकरण पंधरा दिवसांच्या आत प्रांताधिकारी, करवीर यांच्यामार्फत सादर करण्याचे आदेश तत्कालीन नगराध्यक्षांना दिले होते. त्याबाबतची माहिती नस्तीस उपलब्ध नसल्याच्या कारणावरून दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीपसिंह शिवाजीराव धनवडे यांनी केली. याबाबतच्या पत्रावर 'श्री. राजे' असा उल्लेख असून ते निवृत्त झाले असले तरी त्यांच्याकडून वस्तुस्थितीची माहिती मिळविता येईल, असेही प्रतिपादन श्री. धनवडे यांनी केले.

संबंधित अभिलेख सन १९६४ मधील असून कसून शोध घेऊनही प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका श्री. श्रीकांत गोविंद देवकर यांनी केले.

संबंधित कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी वर्गवारीनुसार तपासून त्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका श्री. श्रीकांत गोविंद देवकर यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अहवाल अद्याप अप्राप्त आहे, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. श्रीकांत गोविंद देवकर यांनी विहित मुदतीत अहवाल सादर न केल्याबाबतच्या खुलाशासह दि. १५.०४.२०१० पर्यंत अहवाल आयोगास सादर करावा. अन्यथा ते कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. २५.३.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री भारत पांडुरंग भांगे
मु. पो. उंदरगाव, ता. माढा,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कुर्डुवाडी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
लघु पाटबंधारे,स्थानिक स्तर,
जिल्हा परिषद उपविभाग कुर्डुवाडी,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२८/ २०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.८.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.९.२००८ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** उंदरगाव-वाकाव रस्त्यावरील सी. डी. वर्क्सच्या (मो-यांचे बांधकाम) कामाच्या अनुषंगाने एकूण २ मुद्दे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. भारत पांडुरंग भांगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींमध्ये नमूद केलेल्या ९० दिवसांच्या विहित मुदतीत केले नसल्याने सदरचे अपील हे मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजीराव अंबादास घाडगे
३७, उत्तर कसबा पत्रा तालीमजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, मराठा युवक मंडळ,
संजयनगर, झोपडपट्टी-नं.२, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजीराव अंबादास घाडगे
३७, उत्तर कसबा पत्रा तालीमजवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री.एस.वाय.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, मराठा युवक मंडळ,
संजयनगर, झोपडपट्टी-नं.२, सोलापूर श्री.सी.आर.क्षीरसागर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.८.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्याने दि.३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मराठी युवक मंडळ, सोलापूर ही संस्था नोंदणीकृत असून आपण मागितलेली माहिती सचिव श्री.राजाराम चंद्रकांत क्षीरसागर यांनी दिली नाही. माहिती दहा दिवसात देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर, यांनी देऊनही श्री.राजाराम चंद्रकांत क्षीरसागर यांनी माहिती पुरविली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजीराव अंबादास घाडगे यांनी केली.

संबंधित अर्ज आपल्याला प्राप्त झालेला नाही. अर्ज मिळाल्याच्या पोहोच पावतीवरील स्वाक्षरी आपली नाही, असे प्रतिपादन मंडळाचे सचिव श्री.राजाराम चंद्रकांत क्षीरसागर यांनी केले. संबंधित विश्वस्त संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरत असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तिला लागू होईल, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्यानुसार संस्था सार्वजनिक प्राधिकरण

ठरते, याचे ठोस पुरावे अपीलकर्त्यांनी दिलेले नाहीत. संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत असल्यास देय माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.३.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संजय पद्माकर ढवळे
६५३, नाना पेठ,
आझाद आळी, पुणे-२

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा एस.आर.ए.सी.(प्रशासन),**
सी.डी.ए. गोळीबार मैदान,
पुणे

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४३/२०१०/पुणे |
| २ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. प्रकाश गुजर व श्रीमती राजमती गुजर यांच्या सेवापुस्तकातील जातीच्या नोंदीबाबत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. संजय पद्माकर ढवळे यांनी ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे, सदरचे सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रीय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील आहे. सबब अपिलकर्ता श्री. ढवळे यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अर्जून परसराम कोल्हाळ — **अपीलकर्ता**
मु. पो. नरखेड, ता. मोहोळ,
जि. सोलापूर

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४४/२०१०/सोलापूर |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/१/२०१० |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>दि. २६/७/२००० रोजी केलेल्या शेतीच्या रस्त्याच्या पंचनाम्या बाबतची कागदपत्रे | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता, श्री. अर्जून परसराम कोल्हाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आण्णासो सातगोंडा पाटील
मु.पो.टाकवडे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४६ / कोल्हापूर /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.संजय विष्णू कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.संजय विष्णू कुंभार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.१.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार सर्व माहिती मिळाली असून अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.आण्णासाो सातगोंडा पाटील यानी दि.१३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदराव नानासाहेब शिंदे
मु.बोपेगांव, पो.पांडे, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पं)
पंचायत समिती वाई, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बोपेगांव, पो.पांडे, ता.वाई, जि.सातारा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१/२००९/सातारा | |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक | ६.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पं)
पंचायत समिती वाई, जि.सातारा श्री.एल.जी.गावडे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बोपेगांव, पो.पांडे, ता.वाई, जि.सातारा श्री.आर.ए.निंबाळकर

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | २७.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | १९.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | २.८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | १.१.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | | |

## विवेचन

न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे ग्रामपंचायत दप्तरी मिळकतीला नाव नोंदविण्याबाबतच्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.आनंदराव नानासाहेब शिंदे (वय ८२ वर्षे) यांनी मागितली होती. त्यांची मुख्य मागणी नाव नोंदविण्याची होती. तसेच ग्रामपंचायतीचा ठराव, त्यांनी त्याविरूध्द केलेले अपील या संदर्भात खुलाशाची मागणी त्यांनी केली होती. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि त्यांच्या मागणीनुसार ग्रामपंचायत दप्तरी नोंद घालून तसा उतारा त्यांना देण्यात आला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोपेगांव, पो.पांडे, ता.वाई, जि.सातारा श्री.आर.ए.निंबाळकर यानी केले. अपीलकर्त्याच्या अपील क्रमांक ५५२ मध्ये हाच विषय असल्यामुळे वरील निवेदन व आयोगाचा निर्णय त्याबाबतही लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शांताराम पंढरीनाथ करंजावणे
मु.पो.भुकूम, ता.मुळशी,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,**
उप संचालक, भुमी अभिलेख, पुणे प्रदेश,

**२) जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक,**
अधिक्षक, भुमी अभिलेख, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/७/२००९ व १७/७/२००९ |
| ३ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा स्पष्ट बोध होत नाही.** | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शांताराम पंढरीनाथ करंजावणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जासाठी एकत्रित अपील केले आहे. तसेच अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 30 MAR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रावसाहेब बाबासाहेब पाटील
५९, शांतीकुंज, सि.स.नं.१२०ब/१अ/१, राममंदिराजवळ, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग क्र.१, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१ / सांगली / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रावसाहेब बाबासाहेब पाटील
५९, शांतीकुंज, सि.स.नं.१२०ब/१अ/१, राममंदिराजवळ, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, कोल्हापूर श्री.बी.डी.यमगर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग क्र.१, कोल्हापूर श्री.व्ही.एस.कल्याणकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२०.११.२००९ रोजी घेण्यात आली.

आपण एप्रिल २००६ मध्ये सेवानिवृत्त झालो. आपल्याला सेवानिवृत्ती वेतन व उपदानाची रक्कम मिळण्यासाठी आवश्यक असलेले ना देय व ना विभागीय चौकशीचा ना हरकत दाखला मंडळाचे कार्यकारी अभियंता यानी दिला नाही, उलट आपल्याकडे येणे दर्शविले. मध्यवर्ती कार्यालयाने रक्कम रोखून धरल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग क्र.१, कोल्हापूर यांनी सांगितले. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. आपल्या तक्रारीची योग्य दखल न घेता अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, कोल्हापूर यांनी आपले अपील निकाली काढले. जाणूनबुजून खोटी माहिती देणारे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग क्र.१, कोल्हापूर यांच्यावर दंडात्मक कारवाई करून त्यांची विभागीय चौकशी करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रावसाहेब बाबासाहेब पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांनी सन १९८८ ते १९९१ या काळातील हिशेब न दिल्याने सांगली कार्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र पाठविले नाही, मात्र या संदर्भातील माहिती त्यांना विहित मुदतीत दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग क्र.१, कोल्हापूर श्री.व्ही.एस.कल्याणकर यांनी केले.

माहिती वेळेत दिली असल्यामुळे अपील फेटाळले. देय रकमेबाबत प्रशासकीय कार्यवाही केली. तसेच संबंधित प्रकरणात अन्य व्यक्ती जबाबदार असल्यामुळे श्री.पाटील यांची रक्कम

त्यांना देण्यास हरकत नसल्याचे मध्यवर्ती कार्यालयाने आता कळविले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, कोल्हापूर श्री.बी.डी.यमगर यांनी केले.

श्री.पाटील यांना माहिती देण्यात आली आहे. त्यांचा आक्षेप प्रशासकीय कार्यवाहीतील त्रुटींबाबतचा आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि२३.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुभाष रामचंद्र पुट्टा
स.नं.१६, गणेशनगर,
धायरी, पुणे -४१ **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५८/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/१२/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/१/२०१० |
| ६ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** अपील क्र.३३३/पुणे प्रकरणी अल्पबचत संचालनालयाने दि. ३०/९/२००९ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास सादर केलेल्या अहवालाची छायाप्रत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुभाष रामचंद्र पुट्टा यांनी त्यांच्या राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र.३३३/पुणे प्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अल्पबचत संचालनालय यांनी दि. ३०/९/२००९ रोजी आयोगास सादर केलेला अहवाल मिळणेसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग यांचेकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग यांच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सदर अपिलाच्या अनुषंगाने आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अल्पबचत संचालनालयाने राज्य माहिती आयोगास सादर केलेल्या अहवालाची छायाप्रत आठ दिवसांत अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी नि:शुल्क द्यावी.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दिनकर सदाशिव कांबळे
४०, वानवडी गांव,
पुणे-४०

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (जिं.घ.)**
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे -५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सेवकवर्ग अधिकारी,**
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५९/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/१२/२००९ |
| ५ | अपिलीय प्रधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५/२/२०१० |
| ६ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) श्री. विवेक खरवडरकर यांचे नियुक्ती संदर्भातील शासन पत्र-व्यवहाराच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत ५ मुद्दे<br>२) श्री. आशिष महाडदळकर यांचे संदर्भात उप आयुक्त (जिं.घ.) यांनी महानगरपालिका आयुक्तांना सादर केलेल्या प्रस्तावावरील कार्यवाहीच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्दे | |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दिनकर सदाशिव कांबळे
४०, वानवडी गांव,
पुणे-४०

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (जिं.घ.)**
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे -५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सेवकवर्ग अधिकारी,**
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५९/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/१२/२००९ |
| ५ | अपिलीय प्रधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५/२/२०१० |
| ६ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** १) श्री. विवेक खरवडरकर यांचे नियुक्ती संदर्भातील शासन पत्र-व्यवहाराच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत ५ मुद्दे २) श्री. आशिष महाडदळकर यांचे संदर्भात उप आयुक्त (जिं.घ.) यांनी महानगरपालिका आयुक्तांना सादर केलेल्या प्रस्तावावरील कार्यवाहीच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिनकर सदाशिव कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांच्या माहिती -मागणी अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, सेवक वर्ग विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मारूती भाऊ महाजन
कोरोची(धनगर माळ, अंगणवाडीनजीक),
पो.गंगानगर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय)
कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.५.२००८ व ३०.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी

उपस्थित न राहिल्याने दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीलाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे उपस्थित नव्हते.

अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन, तारदाळ व अखिल भारतीय मानवाधिकार संघटना, संयुक्त राष्ट्र संघ, दिल्ली, शाखा इचलकरंजी यांनी दि.५.९.२००७ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक, इचलकरंजी यांच्याकडे दिलेल्या अर्जावर त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे पाठविलेल्या अहवालाची नक्कल जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय), कोल्हापूर, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांच्या पातळीवरून देण्यात आली नाही. संबंधितांच्या कसुरीबाबत प्राथमिक चौकशी चालू असून अंतिम निर्णय झालेला नाही, असे कारण देऊन अहवालाची नक्कल नाकारण्यात आली. मात्र संबंधितांच्या चुकीबाबतची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये/ई रोलवर घेण्यात आली आहे, असे अहवालावरील कार्यवाहीबाबत माहिती देताना जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केलेले आहे. अहवालाबाबत निर्णय झाला नसला तर अशी नोंद कशी करण्यात आली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अहवालाची प्रत व नेमकी माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मारूती भाऊ महाजन यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय), कोल्हापूर, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या कारणांमुळे सुनावणीला अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्याची विनंती केली होती, ती आयोगाने मान्य केली आहे. दि.१३.२.२००९ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शहाजी उमाप यांनी आयोगाला निवेदन सादर केले. संबंधितांच्या चुकीबाबतची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये/ईरोलवर घेण्यात आली असल्याचेच श्री.महाजन यांना कळविण्यात आले आहे. संबंधितांच्या कसुरीबाबत प्राथमिक चौकशी चालू असल्याने व त्यावर अद्यापही अंतिम निर्णय झालेला नसल्याने चौकशीमध्ये बाधा अथवा अडचणी येण्याची आवश्यकता विचारात घेऊन चौकशी अहवालाची प्रत देता येत

नसल्याचे या निवेदनात अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शहाजी उमाप यांनी नमूद केले आहे. तथापि मूळ अर्जाला सुमारे अडीच वर्षे होत आली आहेत, हे लक्षात घेता संबंधित चौकशी एव्हाना पूर्ण झाली असणे अपेक्षित असून अहवालाची प्रत अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय), कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांनी अपीलकर्त्यास देऊन दि.५.४.२०१० पर्यंत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.२२.३.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बादशहा हुसेन मुलाणी — अपीलकर्ता
मु.पो.वडुज. ता.खटाव, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, — उत्तरवादी
नवीन प्रशासकीय इमारत, एस.टी स्टँड समोर, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सदर बाजार, सातारा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५९/सातारा | |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक | ६.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बादशहा हुसेन मुलाणी
मु.पो.वडुज. ता.खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
नवीन प्रशासकीय इमारत, एस.टी स्टँड समोर, सातारा श्री.अरूण काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सदर बाजार, सातारा श्री.एन.ए.माळी

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | २४.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | ३.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | २४.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | १५.१२.२००८ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | | |

## विवेचन

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नोकरभरतीसाठी घेतलेल्या लेखी परीक्षेतील तपशिलाची मागणी आपण केली होती, ती दिली नाही. यापूर्वीच्या आपल्या अपिलांमधील (अपील क्र.११५) माहितीही मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बादशहा हुसेन मुलाणी यांनी केली.

अपीलकर्त्याची मुख्य तक्रार त्यांच्या मुलाला नोकरीत घेतले नाही ही आहे. तसेच त्यांना स्वत:ला नोकरीतून कमी केले होते. आता पुन्हा घेण्यात आले आहे. वेळोवेळी त्यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. अभिलेखही अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले आहेत. बँकेला कोणतेही शासकीय अर्थसहाय्य वा सवलत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, अशी भूमिका बँकेने सातत्याने घेतली असून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नवीन प्रशासकीय इमारत, सातारा यांनी ते मान्य केले आहे, असे प्रतिपादन बँकेचे सरव्यवस्थापक श्री.एन.ए.माळी यांनी केले. ते रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री.अरूण काकडे यांनी नमूद केले.

निवड झालेल्या उमेदवारांच्या यादीची प्रत अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास द्यावी. नोकरभरतीतील निर्णयाची योग्य-अयोग्यता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याची भूमिका कायम

ठेवूनही पारदर्शकतेच्या दृष्टीने माहिती देण्याची बँकेची भूमिका असल्याचे श्री.नलावडे यांनी नमूद केले, ते प्रशंसनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. महमद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एमआयडीसी,
सातारा-४१५ ००४ .. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा प्रकल्प अधिकारी,
(नगरपालिका शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६/२००९/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६.०२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. महंमद बाबालाल मुल्ला<br>३८,लक्ष्मीनगर, एमआयडीसी, सातारा-४१५ ००४<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा<br>श्री. रमेश चव्हाण<br><br>**जन माहिती अधिकारी तथा**<br>जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका शाखा),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती दीपा ह. बापट | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १२.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक १७.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २४.१२.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांची खातेनिहाय चौकशी करण्याच्या मागणीबाबतचा जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल आपल्याला दिला नाही. निविदांबाबत मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी नियमानुसार योग्य कार्यवाही केलेली नसल्यामुळे आपण अर्ज केला होता. परंतु त्यांनी स्वतः स्वतःची चौकशी केली, हे योग्य नाही. फेरसुनावणीसाठी प्रकरण पाठवावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. महंमद बाबालाल मुल्ला यांनी केली.

श्री. हेमंत ता. गोडसे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. मुल्ला यांनी माहिती मागितली होती. कार्यवाहीसाठी मूळ तक्रार अर्ज मुख्याधिकाऱ्यांकडे पाठविला. त्यानुसार श्री. मुल्ला यांना माहिती देण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करून अहवाल द्यावा, ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती. दीपा ह. बापट व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री. रमेश चव्हाण यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.३.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुधाकर कृष्णा कुलकणी
११८५/ख-२, दुसरी गल्ली, राजारामपुरी
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव ,**
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६७/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८/१२/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आयोगाकडील अपील क्र.५६०/२००९/पुणे प्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही न केल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लागू करण्याचे अधिकार कोणास आहेत, शास्ती लागू करु नये म्हणून अपील करता येते काय, याबाबतची तरतुद काय आहे, सदर अपिलात शास्ती लागू का करण्यात आली नाही, शास्ती लागू करण्यासाठी कोणाकडे व कशा प्रकारे अर्ज करावा इ. खुलासेवजा माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग यांनी दिलेले उत्तर, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांचा निर्णय योग्य असल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.